SMBT

# March 2024 Month News Coverage



SMBT

# एसएमबीटी क्लिनिकचा सुपर स्पेशालिटी बाहयरुग्ण विभाग पूर्णवेळ सुरु

## एसएमबीटी आरोग्य सेवेचा 'ब्रँडनेम' - डॉ. सुधीर तांबे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - काँग्रेस पक्षाचेनेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली विकासातून वैभवशाली ठरलेल्या संगमनेर शहरांमध्ये गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याच्या अत्याधुनिक व दर्जेदार सुविधा त्वरित व माफक दरात मिळाव्यात याकरता एसएमबीटी क्लिनिकच्या वतीने पूर्णवेळ सुपरस्पेशलिटी बाह्य रुग्णविभाग अमृतनगर येथील अमृतवाहिनी हॉस्पिटलमध्ये नव्याने सुरू करण्यात आला आहे.




अमृतवाहिनी रूलर हॉस्पिटल येथे एसएमबीटी क्लिनिकच्या बाहय रुग्ण विभागाचा शुभारंभ झाला. यावेळी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, जि. प. सदस्य रामहरी कातोरे, मुख्याधिकारी श्रीराम कुऱ्हे, प्राचार्य डॉ.अशोक पाटील, डॉ. बाळकृष्ण देशपांडे, डॉ. सचिन गोडसे, डॉ. नितीन बस्ले, डॉ. राज म्हस्के, विष्णुपंत रहाटळ, सुरज कडलग, डॉ. सुरज तूपसाखरे, महेश वाव्हळ, सिताराम दिघे, धनंजय भुसाळ, रमेश दिघे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मा. आ. डॉ तांबे म्हणाले की, तालुक्यातील गोरगरीब आदिवासी व सर्वसामान्य माणसांच्या आरोग्य सेवेकरता थोर स्वातंत्र्य सेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून अमृतवाहिनी रूलर हॉस्पिटल सुरू केले. काँग्रेस नेते आमदार थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एसएमबीटी ही संस्था आता देशातील आरोग्यसेवेचा ब्रँड नेम ठरली आहे. दररोज हजारो शस्त्रक्रिया तेथे होत असून संगमनेर तालुक्यातील नागरिकांना सोयीचे व्हावे म्हणून अमृतवाहिनी रूलर हॉस्पिटल या ठिकाणी अद्यावत सुविधा देताना बाह्य रुग्ण विभाग सुरू करण्यात आला आहे .यामध्ये एसएमबीटी मधील तज्ञ डॉ. दररोज भेट देणार असून नागरिकांची योग्य तपासणी करणार आहेत. यामुळे संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांची मोठी सोय होणार असल्याचे ते म्हणाले.

तर कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, प्रत्येक माणूस आरोग्याकडे दुर्लक्ष करत असून त्यामुळे आरोग्याच्या समस्या उद्भवतात. ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्या याकरता एसएमबीटीच्या माध्यमातून अत्यंत चांगले काम होत असून संगमनेर तालुक्यात नव्याने सुरू झालेल्या या बाह्यरुग्ण विभागामुळे गोरगरीब, शेतकरी, महिला यांची मोठी सोय होणार आहे. येथे काही ऑपरेशन सह विविध शस्त्रक्रिया तसेच तपासण्या केल्या जाणार असून मोठ्या शस्त्रक्रिया तातडीने एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये केल्या जाणार आहेत. या उपक्रमाचा जास्तीत जास्त महिला व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

या बाह्यरुग्ण विभागामध्ये दररोज हृदयविकार शस्त्रक्रिया, कर्करोग, मूत्रविकार, मेंदू व मणके विकार, सांधेरोपण क्रिया, प्लास्टिक सर्जरी, जन्मजात आजार, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, डीआरटीडी, ईपी स्टडी, आदींसह सोनोग्राफी, रक्त, लघवी, तपासणी अशा विविध तपासण्याही केल्या जाणार आहेत. यावेळी एसएमबीटी मधील विविध डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांसह विविध कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ. गौरव वर्मा दर मंगळवार व शुक्रवारी येणार

महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी कर्करोग तपासणी केली जाणार आहे. तर दर मंगळवार व शुक्रवारी प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. गौरव वर्मा हे हृदयरोग विकाराची तपासणी करणार आहेत. तसेच दर शुक्रवारी मेंदू व मणके विकार यांच्या हे तपासण्या होणार असून महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी मूत्ररोग विकार तपासणी होणार आहे. या क्षेत्रातील तज्ञ व नामवंत डॉ. तपासणीसाठी उपस्थित राहणार असून रुग्णांवर पुढील उपचार केले जाणार आहेत.

# खेड्यातून येणाऱ्याला नसते पराभवाची भीती

## डॉ. ए. वेलूमनी : एसएमबीटी फेस्टचा समारोप; अजिंक्य रहाणे, विक्रांत मॅसी, मलिकने वेधले लक्ष

■ **सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १९ : आपल्या देशातील खेडी ही चालती-बोलती विद्यापीठे आहेत. तेथे दररोज सकाळपासून रात्रीपर्यंत प्रश्न सोडविण्याचे काम सुरू असते. इथे कुठलीही गोष्ट लिखित नसते, इथे फक्त सुरू असतात ते वेगवेगळे प्रयोग. त्यामुळे खेड्यातून जी व्यक्ती पुढे आलेली असते, त्या व्यक्तीला पराभूत होण्याची भीती कधीही नसते, असे उद्‍गार प्रख्यात शास्त्रज्ञ व थायरोकेअरचे संस्थापक डॉ. ए. वेलूमनी यांनी काढले. ते एसएमबीटी फेस्ट २०२४ च्या दुसऱ्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

एसएमबीटीचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे यांच्यासह अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, डॉ. किरण पाटील, डॉ. किरण जगताप, प्राचार्य डॉ. प्रदीप भावड, डॉ. योगेश उशीर, डॉ. कविता मातेरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. डॉ. वेलूमनी यांचा 'एसएमबीटी'च्या पॅथोलॉजी, मायक्रोबायोलॉजी विभागातर्फे सन्मान करण्यात आला.

डॉ. वेलूमनी यांनी त्यांच्या खडतर आयुष्याचा प्रवास उलगडला. त्यांचा जन्म हलाखीची परिस्थिती असलेल्या कुटुंबात झाला. अनेक अडचणी समोर होत्या. मात्र, त्यांनी कधीही परिस्थितीमुळे शिक्षण थांबू दिले नाही. त्यांच्या आईने काबाडकष्ट करीत सर्व भावंडांना उत्तम शिक्षण दिल्याचे डॉ. वेलूमनी अभिमानाने सांगतात.


**डॉ. ए. वेलूमनी**

ते म्हणाले, की महाविद्यालयीन शिक्षण संपल्यावर नोकरी करायची होती. तब्बल ५० पेक्षा अधिक ठिकाणी मुलाखती दिल्या. अनुभव नसल्याने नोकरी नाकारण्यात आली, तेव्हाच आता नोकरी मागणारे नाही तर नोकरी देणारे बनायचे, असा निश्चय केला. तमिळनाडू सोडून मुंबईत आल्यावर 'अनेक किलोग्राम असलेले शरीर सोडून मी केवळ शरीरातील १५ ग्रॅम असलेल्या थायरॉईड ग्रंथींवर काम करण्याचे ठरविले. एक गोष्ट निश्चित करून तीच फोकस करून खोलवर जाऊन अभ्यास करून त्यावर काम केले. यानंतर मुंबईत छोटेखानी १० बाय १० च्या खोलीत त्यांनी लॅब सुरू केली. आज या लॅबचा विस्तार केवळ महाराष्ट्र किंवा भारतात नाही, तर जगातील दहा देशांत आहे. विशेष म्हणजे, २५ हजारांपेक्षा अधिक नागरिकांना त्यांनी नोकरी दिली. त्यांच्या कंपनीत नोकरी करण्यासाठी व्यक्ती खेड्यातील असली पाहिजे, इंग्रजी भाषा आलीच पाहिजे असे काहीही नाही, शेतकऱ्याचा मुलगा किंवा मुलगी असली पाहिजे असे नियम असल्याचे त्यांनी सांगितले.

### 'बारावी फेल'मुळे जिंकायला शिकलो

■ **हलाखीच्या परिस्थितीतून अधिकारीपदाला गवसणी घालता येते, याबाबत विद्यार्थ्यांशी वार्तालाप करीत विक्रांत मॅसी याने मने जिंकली. तो म्हणाला, की 'बारावी फेल' चित्रपट हे केवळ औचित्य होते, इथून खऱ्या अर्थाने जिंकायला शिकलो. दिल्लीत हजारो मुलं यूपीएससी करण्यासाठी येतात. आज चित्रपटामुळे या परिसरात चार मोफत लायब्ररी सुरू झाल्या आहेत. 'बारावी फेल' चित्रपटाच्या यशाचे गमक विक्रांतने या वेळी सांगितले. विक्रांतच्या मालिकांमधील भूमिका आणि मिर्झापूरसारख्या गाजलेल्या भूमिकांबाबतही विद्यार्थ्यांनी मनमोकळा संवाद साधला.**

SMBT

LOKMAT TIMES • **Anchor**

# ‘Villages in country are universities’

## Dr A Velumani addressed concluding ceremony of SMBT Fest 2024

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, MAR 19

Villages in our country are live universities where non-stop work of finding solutions to problems is on from morning to night, every day. Nothing is in written form here; just different experiments are conducted. Therefore, a person who has come from a village never has the fear of defeat, said the renowned scientist and founder of Thyrocare Technologies Limited Dr Velumani. He was speaking as the chief guest on the second day of SMBT Fest 2024 organised at SMBT Medical College.

Managing Trustee of SMBT Dr Harshal Tambe, Dean Meenal Mohgaonkar, Dr Kiran Patil, Dr Kiran Jagtap, Principal Dr Pradeep Bhabad, Dr Yogesh Ushir, Dr Kavita Matere, dignitaries from various fields, and teaching and non-teaching staff were present.




Dr Velumani addressed the audience and revealed his tough life journey. He was born in a family of modest means. He faced difficulties, but he never let his education stop because of his circumstances. He said that his mother did hard work and gave a good education to all his siblings.

After completing his college education, he wanted to get a job and gave interviews in more than 50 places. However, he was denied a job because he had no experience. It was then that he decided to become an employer rather than a job seeker.

**While interacting with students, Vikrant Massey talked about the possibility of attaining the position of an officer in a harsh situation. He said that the film ‘12th Fail’ was just a medium to convey the same message. Thousands of youths come to Delhi to prepare for the UPSC examination. Notably, four free libraries have started in the area because of the film, said Vikrant Massey. Students also had a candid conversation about Vikrant’s roles in serials and popular roles like Mirzapur.**

**The students were overwhelmed by the songs of famous singer Amaal Malik. They enjoyed the evening with a mix of new and old songs from the album. Amaal was also overwhelmed by the response of the students. He said on the occasion that it was the best programme in Nashik.**

An expert in mathematics, Dr Velumani also worked at the Bhabha Atomic Research Center for a few days, but chose to quit his job, on the same day as his wife, as they wanted to do something different. He insists that moment was decisive and a big risk. He also mentioned how his wife’s support was important after leaving the job.

Ignoring the whole body, he decided to work on the tiny thyroid glands. Focused on it, studied deeply, and worked on it. Then, he started a lab in a small 10x10 room in Mumbai. Today, these labs have expanded to not just Maharashtra or India, but to ten countries of the world.

Deans, Principals, and senior officers of various colleges in the SMBT campus, as well as students interacted with him. After this Dr Velumani attended the scheduled programme of the fest. He was honoured by the Department of Pathology, Microbiology of SMBT. Dr Velumani praised the SMBT management.

Nashik First
Page No. 4 Mar 20, 2024
Powered by: erelego.com

SMBT

# देशातील खेडी चालतीबोलती विद्यापीठे

## शास्त्रज्ञ डॉ. ए. वेलुमणी : 'एसएमबीटी फेस्ट- २०२४'

**लोकनामा प्रतिनिधी**

**नाशिक** : आपल्या देशातील खेडी ही चालतीबोलती विद्यापीठे आहेत. याठिकाणी दररोज सकाळपासून रात्रीपर्यंत प्रश्न सोडविण्याचे काम सुरू असते. इथे कुठलीही गोष्ट लिखित नसते, इथे फक्त सुरू असतात ते वेगवेगळे प्रयोग. त्यामुळे खेड्यातून जी व्यक्ती पुढे आलेली असते, तिला पराभूत होण्याची भीती कधीही नसते, असे उद्गार प्रख्यात शास्त्रज्ञ व थायरोकेअरचे संस्थापक डॉ. ए. वेलुमणी यांनी काढले. एसएमबीटी फेस्ट २०२४ च्या दुसऱ्या




दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

याप्रसंगी एसएमबीटीचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे यांच्यासह अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, डॉ. किरण पाटील, डॉ. किरण जगताप, प्राचार्य डॉ. प्रदीप भाबड, डॉ. योगेश उशीर, डॉ. कविता मातेरे, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. डॉ. वेलुमणी यांनी त्यांच्या खडतर आयुष्याचा प्रवास उलगडला. ते म्हणाले की, महाविद्यालयीन शिक्षण संपल्यानंतर त्यांना नोकरी करायची होती. यावेळी त्यांनी तब्बल ५०पेक्षा अधिक ठिकाणी मुलाखती दिल्या. यादरम्यान त्यांच्याकडे अनुभव नसल्याने त्यांना नोकरी नाकारण्यात आली. याचवेळी त्यांनी निश्चय केला होता की, आता नोकरी मागणारे नाही, तर नोकरी देणारे आपण बनायचे आहे. यानंतर त्यांनी तामिळनाडू सोडून पुढील प्रवास मुंबईच्या दिशेने केला.

गणितात तज्ज्ञ असलेल्या डॉ. वेलुमणी यांनी काही दिवस भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर येथे नोकरीही केली. यानंतर जगावेगळं काही करण्याचे मनात असल्यामुळे त्यांनी व त्यांच्या पत्नीने एकाच दिवशी नोकरी सोडली. हा क्षण किती निर्णायक होता. किती मोठी ही रिस्क होती.

याबाबत ते आवर्जून सांगतात. नोकरी सोडल्यानंतर पत्नीची साथ कशी महत्त्वाची असते हेदेखील त्यांनी नमूद केले. अनेक किलोग्रॅम असलेले शरीर सोडून मी केवळ शरीरातील १५ ग्रॅम असलेल्या थायरॉइड ग्रंथींवर काम करण्याचे ठरवले. एक गोष्ट निश्चित करून, तीच फोकस करून तिच्यात खोलवर जात अभ्यास करून त्यावर काम केले. यानंतर मुंबईत छोटेखानी १० बाय १० च्या खोलीत त्यांनी लॅब सुरू केली. आज या लॅबचा विस्तार केवळ महाराष्ट्र किंवा भारतात नाही, तर जगातील दहा देशांत लॅब सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.

### » '१२ वी फेलमुळे जिंकायला शिकलो'

**हलाखीच्या परिस्थितीतून अधिकारीपदाला गवसणी घालता येते. याबाबत विद्यार्थ्यांशी वार्तालाप करत विक्रांत मॅसी याने मने जिंकली. तो म्हणाला की, १२ वी फेल चित्रपट हे केवळ औचित्य होते. इथून खऱ्या अर्थाने जिंकायला शिकलो. दिल्लीमध्ये हजारो मुले यूपीएससी करण्यासाठी येतात. आज चित्रपटामुळे या परिसरात चार मोफत लायब्ररी सुरू झाल्या आहेत. १२ वी फेल चित्रपटाच्या यशाचे गमक विक्रांतने याप्रसंगी सांगितले. विक्रांतच्या मालिकांमधील भूमिका आणि मिर्झापूरसारख्या गाजलेल्या भूमिकांबाबतदेखील विद्यार्थ्यांनी मनमोकळा संवाद साधला.**

दिव्य मराठी
नाशिक सिटी 20-03-2024

SMBT


# खेडी म्हणजे चालती-बोलती विद्यापीठे

## डॉ. ए. वेलूमणी यांचे प्रतिपादन, 'एसएमबीटी फेस्ट'चा समारोप

प्रतिनिधी | नाशिक

भारतातील खेडी ही चालती-बोलती विद्यापीठे आहेत. याठिकाणी दररोज प्रश्न सोडविण्याचे काम सुरू असते. त्यामुळे खेड्यातून जी व्यक्ती पुढे आलेली असते, तिला पराभूत होण्याची भीती कधीही नसते, असे उद्‌गार प्रख्यात शास्त्रज्ञ व थायरोकेअरचे संस्थापक डॉ. ए. वेलूमणी यांनी काढले.

'एसएमबीटी फेस्ट २०२४' च्या समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. वेलुमणी बोलत होते. याप्रसंगी एसएमबीटीचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे


डॉ. वेलूमणी

यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

डॉ. वेलूमणी पुढे म्हणाले की, हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले. गणितज्ञ झाल्यानंतर तामिळनाडूतून मुंबईत येत भाभा अ‍ॅटोमिक रिसर्च सेंटर येथे नोकरी केली. यानंतर नोकरी सोडत थॉयराइडवर संशोधन केले. मुंबईत एका खोलीत लॅब सुरू केली. आज या लॅबचा विस्तार जगातील दहा देशापर्यंत झाला आहे डॉ. वेलूमणी यांचा सन्मान एसएमबीटीच्या पॅथॉलॉजी विभागाने केला.

लोकमत


SMBT

# देशातली खेडी ही चालतीबोलती विद्यापीठे

## डी.ए. वेलुमणी : अजिंक्य रहाणे, विक्रांत मॅसी यांनी वेधले लक्ष

**नाशिक** : आपल्या देशातील खेडीपाडी ही चालती बोलती विद्यापीठे आहेत. इथे फक्त सुरू असतात ते वेगवेगळे प्रयोग. त्यामुळे खेड्यातून जी व्यक्ती पुढे आलेली असते, त्या व्यक्तीला पराभूत होण्याची भीती कधीही नसते, असे उद्‌गार प्रख्यात शास्त्रज्ञ व थायरोकेअरचे संस्थापक डॉ.ए.वेलुमणी यांनी काढले.

एसएमबीटी फेस्टमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी एसएमबीटीचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ.हर्षल तांबे, अधिष्ठाता डॉ.मीनल मोहगावकर, डॉ.किरण पाटील, डॉ.किरण जगताप, प्राचार्य डॉ.प्रदीप भाबड, डॉ.योगेश उशीर, डॉ.कविता मातेरे आदी उपस्थित होते.



डॉ.वेलुमनी यांनी त त्यांच्या खडतर आयुष्याचा प्रवास उलगडला. त्यांच्या आईने काबाडकाष्ट करत सर्व भावंडांना उत्तम शिक्षण दिल्याचे सांगितले. थेट रुग्णाच्या घरात जाऊन थायरॉईडची तपासणी करत असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.वेलुमनी यांचा सन्मान एसएमबीटीच्या पॅथोलॉजी, मायक्रोबायोलॉजी विभागातर्फे करण्यात आला.

विद्यार्थ्यांशी वार्तालाप करत विक्रांत मॅसी याने मने जिंकली. १२वी फेल चित्रपटाच्या यशाचे गमक विक्रांतने याप्रसंगी सांगितले. विक्रांतच्या मालिकांमधील भूमिका आणि मिर्झापूरसारख्या गाजलेल्या भूमिकांबाबतही विद्यार्थ्यांनी मनमोकळा संवाद साधला. प्रख्यात गायक अमाल मलिकच्या गाण्यांवर उपस्थित विद्यार्थ्यांनी ठेका धरला.

Hello Nashik Gramin
Page No. 3 Mar 20, 2024
Powered by: erelego.com

दिव्य मराठी
नाशिक सिटी 07-04-2024

# १०० शाळांच्या विद्यार्थ्यांना दिले निरोगी राहण्याचे धडे

## बालरोगतज्ज्ञ संघटना, एसएमबीटीचा उपक्रम



प्रतिनिधी | नाशिक

बाल आणि पौगंडावस्थेतील मुले निरोगी रहावीत, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी नंदी हिल्स येथील प्रियदर्शनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये निरोगी कसे राहावे याचे धडे देण्यात आले. भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना आणि एसएमबीटी मेडिकल कॉलेज यांच्यात झालेल्या करारानुसार 'संकल्प : संपूर्ण स्वास्थ्य' अंतर्गत १०० वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे दिले जात आहेत. याप्रसंगी एसएमबीटी मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर, डॉ. रेखा हरिष, डॉ. दीपक पांडे, आयएपी ईबी सदस्य व ज्युपिटर हॉस्पिटलचे मुख्य बालरोग अतिदक्षतातज्ज्ञ डॉ. परमानंद आंदणकर आदी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना स्थूलपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, तसेच यकृत, मूत्रपिंड यांचे आजार व विविध प्रकारचे कर्करोग आदींचा धोका कमी व्हावा यासाठी आरोग्यदायी सवयी कशा अंगीकाराव्यात याची माहिती देण्यात आली.

ठाणेवैभव

SMBT

# मोफत पोटविकार (गॅस्ट्रो) तपासणी व उपचार शिबीर

**कसारा :** एसएमबीटी हॉस्पिटल घोटी आणि एस एम बी टी क्लिनिक शहापूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार 20 मार्च रोजी शहापूर तालुका परिसरातील रुग्णांसाठी मोफत उदर विकार तपासणी आणि उपचार शिबीर आयोजित केले आहे.

शहापुरातील प्रसिद्ध अशा अंबिका देवी मंदिराच्या मागे, स्टेट बँक समोरील सरस्वती अपार्टमेंटमध्ये हे शिबीर सकाळी 10 ते दुपारी 2 च्या दरम्यान पार पडणार आहे. यावेळी रुग्णांना तज्ज्ञ गॅस्ट्रोइन्ट्रोलॉजिस्ट यांचा मोफत सल्ला मिळणार असून अतिशय अल्पदरात एन्डोस्कोपी व इतर चाचण्या करण्यात येणार आहेत. आतड्यांना सूज येणे, वारंवार अतिसार होणे, पोटात जंत होणे, अचानक वजन कमी होणे, बद्धकोष्ठता आदी लक्षणे आढळल्यास टाळाटाळ न करता या शिबिराचा अवश्य लाभ घेण्याचे व नाव नोंदविण्याकरिता 7774046866 या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन रुग्णालयाचे मुख्य समन्वयक रफीक शेख यांनी केले आहे.

लोकमत

# देशातील खेडेगावे चालती बोलती विद्यापीठे : वेलुमनी

लोकमत न्यूज नेटवर्क

**संगमनेर :** 'आपल्या देशातील खेडेगावे ही चालती बोलती विद्यापीठे आहेत. याठिकाणी दररोज सकाळपासून रात्रीपर्यंत प्रश्न सोडविण्याचे काम सुरू असते, असे उद्गार प्रख्यात शास्त्रज्ञ व थायरोकेअरचे संस्थापक डॉ. ए. वेलुमनी यांनी काढले.



'एसएमबीटी फेस्ट २०२४'च्या दुसऱ्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी एसएमबीटीचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे यांच्यासह अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, डॉ. किरण पाटील, डॉ. किरण जगताप, प्राचार्य डॉ. प्रदीप भाबड, डॉ. योगेश उशीर, डॉ. कविता मातेरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. डॉ. वेलुमनी यांनी उपस्थितांना संबोधित करत त्यांच्या खडतर आयुष्याचा प्रवास उलगडला. डॉ. वेलूमनी यांचा जन्म अतिशय हालाखीची परिस्थिती असलेल्या कुटुंबात झाला. त्यांच्या आईने काबाडकष्ट करत सर्व भावंडांना उत्तम शिक्षण दिल्याचे डॉ. वेलुमनी अभिमानाने सांगतात. प्रारंभी, एसएमबीटी कॅम्पसमधील विविध महाविद्यालयांतील डीन, प्राचार्य व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी संवाद साधला. यानंतर त्यांनी फेस्टच्या नियोजित कार्यक्रमाला हजेरी लावली. डॉ. वेलुमनी यांचा सन्मान एसएमबीटीच्या पॅथोलॉजी, मायक्रोबायोलॉजी विभागातर्फे करण्यात आला. कुठलेही भाषण करण्यासाठी नाही आलो आणि तत्काळ मुद्यावर बोलण्यास सांगितल्यामुळे डॉ. वेलुमनी यांनी एसएमबीटी व्यवस्थापनाचे कौतुक केले. यावेळी डॉ. वेलुमनी यांना ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

(वा. प्र.)

Ahmednagar Main
Page No. 2 Mar 21, 2024
Powered by: erelego.com


देशदूत

# देशातील खेडी चालती बोलती विद्यापीठे : डॉ. ए. वेलूमनी

## एसएमबीटी फेस्टचा समारोप

**नाशिक । दि. १९ प्रतिनिधी**

देशातील खेडीपाडी ही चालती बोलती विद्यापीठे आहेत. याठिकाणी दररोज सकाळपासून रात्रीपर्यंत प्रश्न सोडविण्याचे काम सुरु असते. इथे कुठलीही गोष्ट लिखित नसते, इथे फक्त सुरु असते ते वेगवेगळे प्रयोग. त्यामुळे खेड्यातून जी व्यक्ती पुढे आलेली असते, त्या व्यक्तीला पराभूत होण्याची भीती कधीही नसते. असे उद्गार प्रख्यात शास्त्रज्ञ व थायरोकेअरचे संस्थापक डॉ. ए. वेलुमनी यांनी काढले. ते एसएमबीटी फेस्ट २०२४ च्या दुसऱ्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे यांसह अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, डॉ. किरण पाटील, डॉ. किरण जगताप, प्राचार्य डॉ. प्रदीप भाबड, डॉ योगेश उशीर, डॉ. कविता मातेरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. डॉ. वेलुमनी यांनी उपस्थितांना संबोधित करत त्यांच्या खडतर आयुष्याचा प्रवास उलगडला.



हलाखीच्या परिस्थितीतून अधिकारी पदाला गवसणी घालता येते याबाबत विद्यार्थ्यांशी वार्तालाप करत विक्रांत मॅसी याने मने जिंकली. गाजलेल्या भूमिकांबाबतदेखील विद्यार्थ्यांशी विक्रांतने मनमोकळा संवाद साधला. प्रख्यात गायक अमाल मलिकच्या गाण्यांवर उपस्थित विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. नव्या-जुन्या गाण्यांसह अल्बम गाण्यांची भर पडल्याने विद्यार्थ्यांची संध्याकाळ मनमुराद आनंदात गेली. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद आणि गायनाची साद यामुळे अमालदेखील भारावला. नाशिकमधील सर्वात चांगला कार्यक्रम असल्याचे याप्रसंगी अमाल मलिकने सांगितले.

Deshdoot Edition
Mar 20, 2024 Page No. 5
Powered by : eReleGo.com

SMBT

SMBT

# व्हेंटिलेटरवरील समृद्धीला मिळाले जीवदान

## सातपूर कॉलनीतील शिक्षक, पालकांची 'लाख'मोलाची आर्थिक मदत

**लोकनामा प्रतिनिधी**



**बेलगाव कुऱ्हे :** एक महिन्यापासून धामणगाव (ता. इगतपुरी) येथील एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये नाशिक मनपा शाळा क्रमांक २८ (सातपूर कॉलनी) मध्ये सातवीत शिक्षण घेणारी विद्यार्थिनी समृद्धी कुंभार न्यूमोनिया, डेंग्यू, टायफाइड, स्वाइन फ्ल्यूच्या संक्रमणाने व्हेंटिलेटरवर बऱ्याच दिवसांपासून उपचार घेत होती. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने शाळेतील शिक्षक, कर्मचारी, पालकांच्या एक लाख रुपयांच्या आर्थिक मदतीमुळे तिला जीवनदान मिळाले.

धामणगावच्या एसएमबीटी हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी उपचार करण्यासाठी मेहनत घेतल्याने महिन्यानंतर ती सुखरूप घरी आली आहे. समृद्धीची आई धुणीभांडी करते, तर वडील मोलमजुरी करतात. त्यामुळे आर्थिक स्थिती बेताची. सुरुवातीला सातपूर कॉलनीत खासगी हॉस्पिटलमध्ये ती उपचार घेत होती. तेथील खर्च करणे पालकांना शक्य नव्हते. वर्गशिक्षक सुरेश चौरे पालकाच्या संपर्कात होते. पालकाने त्यांच्याकडे मदत मागितली व त्यांनी हा विषय शाळेच्या ग्रुपवर मांडला. शाळेतील शिक्षकांनी तत्काळ मदत केली.

शिक्षक सुरेश खांडबहाले यांच्या मदतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत सुरेश चौरे, यशवंत जाधव, पुनाजी मुठे, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, सुरक्षारक्षक, पालक, मित्र परिवार, नातेवाईक यांनी यथाशक्ती आर्थिक योगदान दिलेल्या एक लाख पाच हजार रुपयांची समृद्धीच्या उपचारासाठी मोलाची मदत झाली. समृद्धीच्या आई-वडिलांनी शिक्षकांच्या आर्थिक मदतीमुळेच आमची मुलगी वाचली, अशा भावना व्यक्त करीत आभार मानले. गरीब विद्यार्थिनीला उपचारासाठी सामाजिक दायित्व दाखवीत शिक्षकांनी आर्थिक मदत करीत माणुसकीचे दर्शन घडविल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

गांवकरी

SCAN ME




# एसएमबीटी हॉस्पिटल्स, श्री माणकेश्वर वाचनालय यांच्यातर्फे आरोग्य शिबिर

**निफाड शहर : प्रतिनिधी**

एसएमबीटी हॉस्पिटल धामणगाव आणि श्री माणकेश्वर वाचनालय निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने काल निफाड येथे सर्वरोगनिदान शिबिर उत्साहात झाले.

न्यायमूर्ती रानडे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी पंडित जवाहरलाल नेहरू यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आपल्या प्रास्ताविकात वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी शिबिराचे महत्त्व विशद केले. स्रीरोग, बालरोग आणि मेडिसिन विभागाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी केली. सुमारे एकशे एक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. याप्रसंगी डॉ. सुतार, डॉ. वाळेकर, डॉ. वडगामा, परिचारिका शेंडगे, वळवी, कोऑर्डिनेटर आडके, खेमनार, पांडुरंग धारराव, सागर निकाळे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम, चिटणीस बाळासाहेब कापसे, संचालक तनवीर राजे, बाळासाहेब कर्डिले, राजेंद्र सोमवंशी, सुनील चिखले, ग्रंथपाल बाळासाहेब खालकर, सहाय्यक ग्रंथपाल नितीन बनसोडे, सुनील कापसे, संपत धारराव, नूर शेख, शशिकांत वाघ, शरद शिंदे, सचिन कुंदे, विपुल सेंद्रे, संतोष गिरी, गोपाळ उपाध्ये आणि नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासाहेब कापसे यांनी केले. आभार सुहास सुरळीकर यांनी मानले.

सतत १९ वर्ष वाचकांच्या पसंतीस उतरलेले दैनिक

हिंदूसम्राट

संपूर्ण महाराष्ट्रात अग्रेसर असणारे निर्भिड वृत्तपत्र...

हिंदूसम्राट

मो.९९२२१६००५१

पत्रकार राजेंद्र जी थोरात निफाड तालुका प्रतिनिधी

❖ वर्ष ५ वे ❖ अंक २८२ वा ❖ RNI NO-MAH MAR/2004/20823 ❖ सोमवार २९ मे २०२३ ❖ पान ४ ❖ किंमत ३/-

अथर्व एजन्सी

जमीन, शेती, प्लॉट, घरे, इमारती याची खरेदी विक्री

संपर्क

# एस.एम बी टी हॉस्पिटल व श्री माणकेश्वर वाचनालय याच्या वतीने आरोग्य शिबीर संपन्न

निफाड ( हिंदूसम्राट प्रतिनिधी राजेंद्र थोरात यांजकडून):-एस एम बी टी हॉस्पिटल धामणगाव आणि श्री माणकेश्वर वाचनालय निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने आज निफाड येथे सर्व रोग निदान शिबिर उत्साहात संपन्न झाले.न्यायमूर्ती रानडे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी पंडित जवाहरलाल नेहरू यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आपल्या प्रास्ताविकात वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी शिबिराचे महत्त्व विशद केले. स्री रोग, बालरोग आणि मेडिसिन विभागाच्या तज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी केली. सुमारे एकशे एक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. याप्रसंगी डॉ.सुतार डॉ. वाळेकर, डॉ. वडगामा, परिचारिका शेंडगे, वळवी, कोऑर्डिनेटर आडके , खेमनार पांडुरंग धारराव.सागर निकाळे.यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम चिटणीस बाळासाहेब कापसे संचालक तनवीर राजे, बाळासाहेब कर्डिले, राजेंद्र सोमवंशी, सुनील चिखले,ग्रंथपाल बाळासाहेब खालकर,सहाय्यक ग्रंथपाल नितीन बनसोडे, सुनील कापसे, संपत धारराव, नूर शेख, शशिकांत वाघ, शरद शिंदे सचिन कुंदे, विपुल सेंद्रे संतोष गिरी, गोपाळ उपाध्येआणि



नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब कापसे यांनी तर आभार प्रदर्शन सुहास सुरळीकर यांनी केले.